ePaper
| वर्ष - 7 । अंक -26 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com । मंगळवार, दि. 23 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 30 सप्टेंबरनंतरही 2 हजारांच्या नोटा वैधच!; रिझर्व्ह बँकेचे स्पष्टीकरण



**आतील पानांत**
- पिंपरीत अनधिकृत टॉवरना फुल्ल 'रेंज'!
- संकेतस्थळावर माहिती न भरणाऱ्या रक्तपेढ्यांना भरावा लागणार दंड

# पिंपरी-चिंचवड पुन्हा हादरलं!



## चिखलीमध्ये भरदिवसा एकाचा गोळ्या घालून खून

## » दुचाकीवरून आलेल्या दोघांनी पिस्तुलातून झाडल्या गोळ्या

**। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिंपरी-चिंचवड शहरात भर दिवसा गोळ्या झाडून एकाची हत्या करण्यात आली आहे. ही घटना आज (सोमवारी) दुपारी अडीचच्या सुमारास घडल्याची माहिती चिखली पोलिसांनी दिली आहे. सोन्या तापकीर असं हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी पिस्तुलातून गोळ्या झाडल्या असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयात पुन्हा एकदा खळबळ माजली आहे.



### कायदा सुव्यवस्था प्रश्न

» पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोन्या तापकीर हा चिखली चौकात थांबला होता. तेव्हा, दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्याच्यावर पिस्तुलातून गोळ्या झाडल्या. यात गंभीर जखमी होऊन सोन्या तापकीरचा मृत्यू झाला. या घटनेनंतर अनोळखी हल्लेखोर पसार झाले आहेत. त्यांचा शोध पिंपरी चिंचवड पोलीस घेत आहेत. काही दिवसांपूर्वी सोन्या तापकीर याचे एका व्यक्तिशी वाद झाले होते अशी प्राथमिक माहिती पोलिसानी दिली आहे. १२ मे रोजी भर दिवसा किशोर आवारे यांची गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून हत्या करण्यात आली होती. त्यामुळे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात कायदा सुव्यवस्था प्रश्न निर्माण झालेला आहे का? असे नागरिक विचारत आहेत.

# दहशतवाद, हिंसाचाराच्या विरोधात महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांची शपथ

## » भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी साजरी

**। पिंपरी । महाईन्यूज ।**

"आम्ही,भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो की आम्ही सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करू आणि आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करू तसेच मानवी जिवीत मूल्ये धोक्यात आणणा-या विघटनकारी शक्तींचा प्रतिकार करू" अशी शपथ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांच्या उपस्थितीत घेतली.

भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत भारतरत्न राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त उल्हास जगताप यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.




# पिंपरीत अनधिकृत टॉवरना फुल्ल 'रेंज'!

## महापालिकेचे 328 मोबाइल टॉवरकडे दुर्लक्ष

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**किवळे येथील अनधिकृत जाहिरात होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने होर्डिंगवर कारवाईची मोहीम तीव्र केली आहे. मात्र, आतापर्यंत शहरातील एकाही अनधिकृत व अधिकृत मोबाइल टॉवरवर कारवाई झालेली नाही. शहरात एकूण ९१६ मोबाइल टॉवर असून, त्यातील ३२८ टॉवर अनधिकृत आहेत. यापैकी केवळ ५८८ टॉवर अधिकृत आहेत. शेकडो टन वजन असलेल्या लोखंडी सांगाड्यांना अभय कोणाचे, असा प्रश्न शहरवासीयांकडून उपस्थित केला जात आहे.**



कृत होर्डिंग दुर्घटनेत पाच जण ठार, तर तीन जण गंभीर जखमी झाले. त्यानंतर महापालिकेने शहरातील होर्डिंगवर कारवाई सुरू केली. या कारवाईत आतापर्यंत ७२ होर्डिंग उतविण्यात आले असून, ४३४ अनधिकृत होर्डिंगचालकांकडून थकीत शुल्क भरून नव्याने अर्ज करण्यासाठी आठ दिवसांची मुदत दिली आहे.

दुसरीकडे शहरात ९१६ मोबाइल टॉवर उभे आहेत. विशेष परिश्रम न घेता या टॉवरच्या माध्यमातून दर वर्षी लाखोंचे उत्पन्न मिळते. त्यामुळे इमारतींच्या गच्चीवर टॉवर उभारण्यास अनेक हाउसिंग सोसायट्या; तसेच खासगी मिळकतधारक तयार होतात.

बांधकाम परवानगी विभागाची कोणतीही परवानगी न घेता हे टॉवर इमारतीच्या गच्चीवर उभे करण्यात आले आहेत. या टॉवरचा लोखंडी सांगाडा १०० ते २०० टन वजनाचा असतो. काही टॉवर त्यापेक्षा अधिक वजनाचे असतात. त्यामुळे इमारतींच्या बांधकामावर टॉवरचे अधिकचे वजन वाढते. टॉवर उभारताना आवश्यक प्रमाणात मजबुतीकरण केले की नाही, याची महापालिकेकडून दर वर्षी प्रत्यक्ष तपासणी केली जात नाही. जोड कमकुवत झाल्याने किंवा लोखंडी सांगाडे गंजल्याने; तसेच वादळी वाऱ्यामुळे टॉवर कोसळून दुर्घटनेचा धोका वाढला आहे. त्यामुळे यावर कारवाई का केली जात नाही, किवळेसारखी दुर्घटना घडल्यानंतर महापालिका प्रशासन जागे होणार का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अधिकृत इमारत, डिपॉर्टमेंट ऑफ कम्युनिकेशनची (डीओसी) परवानगी, स्ट्रक्चरल ऑडिटचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे तपासून आवश्यक शुल्क भरल्यानंतर मोबाइल टॉवरला बांधकाम परवानगी विभागाकडून पाच वर्षे मुदतीसाठी परवानगी देण्यात येते.

**916**
एकूण मोबाइल टॉवर

**328**
अनधिकृत मोबाइल टॉवर

**588**
अधिकृत मोबाईल टॉवर

### स्ट्रक्चरल ऑडिट का नाही?

» किवळेतील दुर्घटनेनंतर शहरातील अधिकृत व अनधिकृत अशा सर्व होर्डिंगचे स्ट्रॅक्चरल ऑडिट करण्याचे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी काढले. त्याबाबत वृत्तपत्रात जाहीर प्रकटन प्रसिद्ध करण्यात आले. आयुक्तांनी होर्डिंगचालक व मालक; तसेच जाहिरात एजन्सींची बैठक घेऊन कडक शब्दांत सूचना दिल्या. मात्र, मोबाइल टॉवरबाबत महापालिकेने कोणत्याच सूचना व आदेश काढले नाहीत. त्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

### मिळकतकर भरण्यास दुर्लक्ष

» शहरात मोबाइल टॉवर उभारण्यासाठी महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागाची परवानगी घेतली जाते. टॉवरचालकांकडून कर संकलन विभागाकडून बिगरनिवासी मिळकतीप्रमाणे दर वर्षी मिळकतकर वसूल केला जातो. सर्वेक्षणात आढलेल्या ३२८ अनधिकृत मोबाइल टॉवरचालकांकडून दुप्पट शास्तीकर आकारला जात आहे. हे अनधिकृत टॉवर नामांकित नेटवर्किंग कंपनीचे आहेत. मात्र, मिळकतकर भरण्यास दुर्लक्ष केले जात असल्याने कोट्यवधींची थकबाकी आहे.

### प्रत्यक्षात दीड हजार टॉवर?

» दर वर्षीचा लाखो रुपयांचा मिळकतकर चुकविण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून अनधिकृतपणे मोबाइल टॉवर उभे केले जात आहेत. काही टॉवर अनधिकृत इमारतींवर उभे केले आहेत. या इमारतीवर उभे असलेल्या टॉवरना परवानगी दिल्याचे प्रकार समोर आले आहेत.

---

# संकेतस्थळावर माहिती न भरणाऱ्या रक्तपेढ्यांना भरावा लागणार दंड

## राज्य रक्त संक्रमण परिषदेची माहिती : सूचना करूनही दुर्लक्ष करण्यात येत असल्याने दंडात्मक कारवाई

।पुणे। महाईन्यूज

**ज्या रक्तपेढ्या रक्तसाठ्याची दररोजची माहिती संकेतस्थळावर भरणार नाहीत, अशा रक्तपेढीला प्रति दिवसासाठी एक हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे. याबाबत राज्य रक्त संक्रमण परिषदेने काही दिवसांपूर्वीच या बाबतचे पत्र राज्यातील सर्व रक्तपेढ्यांना पाठविले आहे.**



'सर्वसामान्यांना रक्तसाठ्याची अद्ययावत माहिती सहज उपलब्ध व्हावी म्हणून रक्तसाठ्याची माहिती दररोज संकेतस्थळावर भरावी,' अशा सूचना केंद्र सरकराने आणि राज्य रक्त संक्रमण परिषदेने सर्व रक्तपेढ्यांना वारंवार केल्या आहेत. मात्र, सूचना करूनही याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याने आता दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

कोणत्या रक्तपेढीमध्ये किती रक्त उपलब्ध आहे, याची माहिती अनेकदा रुग्णांना नसते. परिणामी रुग्णांची गैरसोय होते. रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी केंद्र सरकारच्या ई-रक्तकोष आणि राज्य संक्रमण परिषदेच्या संकेतस्थळावर सर्व रक्तपेढ्यांनी रक्तसाठ्याची माहिती भरावी, अशा सूचना पूर्वीपासूनच दिल्या आहेत; तसेच वांरवार अशा प्रकारच्या सूचना करण्यात येत असतात. गेल्या वर्षीदेखील काही रक्तपेढ्यांनी अद्यावत माहिती न भरल्याचे दिसून आले होते.

याबाबत शहरातील खासगी आणि सरकारी रक्तपेढ्यांना विचारले असता सर्व रक्तपेढ्या दररोज दुपारी बाराच्या आत माहिती भरत असल्याचे सांगण्यात आले.

रक्तसाठ्याची माहिती दररोज ई-रक्तकोष आणि राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या संकेतस्थळावर भरली जाते. दररोज सकाळी अद्ययावत माहिती संकेतस्थळावर भरण्यात येते. त्याचबरोबर रक्तपेढीतदेखील माहिती देण्यात येत असते.- डॉ. सोमनाथ खेडकर, प्रमुख, ससून रुग्णालय रक्तपेढी

जवळपास सर्व रक्तपेढ्या नियमीतपणे रक्तसाठ्याची माहिती ई-रक्तकोष आणि राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या संकेतस्थळावर भरत असतात. मात्र, कोणत्या रक्तपेढीत रक्त उपलब्ध आहे, याची माहिती गरजू रुग्णांनादेखील सहजपणे मिळणे आवश्यक आहे. अनेकदा निगेटिव्ह आणि दुर्मीळ रक्तगट मिळण्यास अडचणी येतात. त्यामुळे अशा रक्तगटाची माहिती मिळणे आवश्यक आहे.- राम बांगड, अध्यक्ष, रक्ताचे नाते ट्रस्ट



### सात दिवसांत दंड भरावा लागणार

» माहिती न भरणाऱ्या रक्तपेढीला दंड आकारल्यानंतर सात दिवसांच्या आत दंडाची रक्कम भरावी लागणार आहे. दंडाची रक्कम जमा केल्याशिवाय परवान्याच्या नूतनीकरणासाठी लागणारे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणार नसल्याचे राज्य रक्त संक्रमण परिषदेने स्पष्ट केले आहे. 'त्याचबरोबर इंटरनेट सुरू नव्हते, रक्तदान शिबीरासाठी कर्मचारी गेले होते, मनृष्यबळाची कमतरता आहे, रक्तपेढीला सुटी होती,' या प्रकारची कारणे ग्राह्य धरण्यात येणार नाही. कोणत्याही रक्तपेढीला खुलासा द्यायचा असल्यास त्यांनी पुराव्यासह म्हणजे माहिती भरल्याचा 'स्क्रिनशॉट' सात दिवसांच्या आत राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या कार्यालयास सादर करावा, असेही आदेश म्हटले आहे.

# उपयोगकर्ता शुल्कातून महापालिकेचा 14 कोटींचा गल्ला!

## उपयोग कर्ता शुल्क भरण्यास मालमत्ता धारकांचा भरभरून प्रतिसाद

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने सन 2023-24 या आर्थिक वर्षापासून कचरा संकलन सेवेसाठी मालमत्ता धारकांकडून उपयोगकर्ता शुल्क वसुलीस सुरुवात केली आहे. अवघ्या पावनेदोन महिन्यात 1 लाख 12 हजार करदात्या नागरिकांनी 14 कोटी 20 लाख रुपये उपयोग कर्ता शुल्क भरले आहे. त्यामुळे नागरिकांमधून उपयोग कर्ता शुल्क भरण्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून नागरिक शहर विकासात बहुमूल्य असे योगदान देत आहेत.**



राज्य सरकारने 1 जुलै 2019 रोजीच्या निर्णयानुसार, महापालिकांसाठी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी उपयोगकर्ता शुल्क निर्धारीत केले. त्यानुसार पिंपरी महापालिका सभेने 20 ऑक्टोबर 2021 रोजीच्या ठरावानुसार, शुल्क वसुल करण्यास मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने 1 एप्रिल 2023 पासून वर्गीकृत कचरा सेवाशुल्क हे कर आकारणीच्या म्हणजेच नागरिकांच्या घरपट्टीच्या बीलामधून आकारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

शहरात पाच लाख 97 हजार 785 मालमत्ता आहेत. घरटी दरमहा ६० रुपये व व्यावसायिक आस्थापना असलेल्या मालमत्तांना आकारमानानुसार शुल्क आकारण्यात येत आहे. महापालिकेला सर्वात जास्त खर्च हा पाणीपुरवठा, आरोग्य आणि जल:निसारण या प्रमुख गोष्टींवर येत आहे.

त्यामुळे या योजना अंशतः स्वयंपूर्ण होण्यासाठी केंद्र व राज्य शासन वेळोवेळी महापालिकांना मार्गदर्शन, सुचना, अध्यादेश जाहीर करत असते. केंद्र सरकारकडून स्मार्ट सिटी, अमृत योजना अथवा अन्य कोणत्याही केंद्रीय योजनांसाठी अशा प्रकारचे शुल्क लागू करण्याचे निर्देश महापालिकांना देण्यात येतात. केंद्र सरकारकडून 15 वा वित्त आयोग, स्मार्ट सिटी, अमृत योजना यासह मुलभूत पायाभूत सुविधांचे प्रकल्प देण्यासाठी उपयोग कर्ता शुल्क लागू करण्यासाठी राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना बंधनकारक केले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेची स्वच्छ सर्वेक्षणामधील कामगिरी समाधानकारक असली तरी उपयोग कर्ता शुल्क लागू नसल्यामुळे किंवा अन्य बाबींमुळे मानांकन कमी मिळत होते. या पार्श्वभूमीवर आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी उपयोग कर्ता शुल्क लागू करण्याची पाऊले उचलली आहेत. त्यामुळे शासन आदेशाचे तंतोतंत पालन करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. महापालिकेच्या आरोग्य विभागाने उपयोग कर्ता शुल्काच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही पूर्ण केल्यानंतर कर संकलन विभागाकडे उपयोग कर्ता शुल्क वसूल करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार या वर्षांपासून शुल्क लागू करण्यात आले आहे. पाठीमागील तीन वर्षांचा एकाच वेळी भार पडू नये म्हणून पालिकेने चालू वर्षाचे व पाठीमागील एक वर्ष अशी चार वर्षांमध्ये ही वसुली करण्यात येणार आहे.

### शुल्क भरणारे

| मालमत्ता | संख्या |
|---|---|
| औद्योगिक | 620 |
| निवासी | 1,03,056 |
| बिगर निवासी | 7059 |
| मिश्र | 1645 |
| एकूण | 1,12,380 |

### वित्त आयोगाचे अनुदान मिळण्यास मोठा फायदा होणार

15 व्या वित्त आयोगामध्ये जे अनुदान मिळणार आहे, त्यांच्यासाठी उपयोग कर्ता शुल्काचा निकष आहे. या शुल्काच्या वसुलीच्या प्रमाणामध्ये 15 व्या वित्त आयोगाचे अनुदान महापालिकेला मिळणार आहे. त्यामुळे आता महापालिकेला 15व्या वित्त आयोगाचे भरघोस अनुदान मिळू शकेल.

**सुरूवातीच्या काळात या शुल्काला काहीसा विरोध झाला असला तरी शहरवासियांची प्रगतशील मानसिकता आणि विकासात योगदान देण्याची वृत्ती आहे. त्यामुळेच यावर्षी नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिलेला आहे. या शुल्काच्या माध्यमातून आरोग्य विभागाच्या सेवा सुधारण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ आणि सुंदर होण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.**

**- शेखर सिंह, आयुक्त**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रकल्प सिद्धीच्या माध्यमातून बचत गटातील महिला घरोघरी बिले वाटप करीत आहेत. त्यांचे उपयोगकर्ता शुल्कबाबत प्रशिक्षण घेण्यात आले आहे. बिले वाटप करताना या महिला भगिनी शुल्काबाबत नागरिकांचे प्रबोधन करीत आहेत त्यामुळे नागरिकांचा प्रतिसाद मिळतो आहे. जमा झालेल्या रकमेतून कचरा संकलन सेवा अधिक सक्षम करण्यात येईल.**

**– जितेंद्र वाघ**
**अतिरिक्त आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# आयपीएल क्रिकेट सामन्यावर सट्टा खेळणाऱ्या ९ जणांना अटक!

## हिंजवडीत सुरू होता ऑनलाइन सट्टा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवडमध्ये आयपीएलच्या क्रिकेट सामन्यांवर ऑनलाइन जुगार खेळणाऱ्या ९ जणांना अनैतिक मानवी वाहतूक विभागाने अटक केली आहे. ४ लाख ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. दोन लॅपटॉप, तेरा मोबाईलचा यात समावेश आहे. ही कारवाई हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली आहे. लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध कोलकत्ता नाईट रायडर्स या क्रिकेट सामन्यावर आरोपी सट्टा खेळत होते.**





अवघ्या देशभर आयपीएल क्रिकेट सामने बघितले जात असून यावर बेटिंगदेखील मोठ्या प्रमाणावर चालत असल्याचं समोर आलेले आहे. पिंपरी चिंचवड शहरात अनेकदा सट्टा घेणाऱ्या आणि ऑनलाइन सट्टा खेळणाऱ्या अशा दोन्ही व्यक्तींवर कारवाई केल्याचे पाहायला मिळाले आहे. हिंजवडी परिसरातील मारुंजी येथे वैभव बाबा राम डिक्कर आणि इतर काही व्यक्ती लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध कोलकत्ता नाईट रायडर्स या आयपीएल क्रिकेट सामन्यावर ऑनलाइन सट्टा खेळत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक विभागाला मिळाली. त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन सापळा रचून सट्टा खेळणाऱ्याला बेड्या ठोकल्या आहेत.

### या पोलीस पथकाने केली कारवाई

आरोपीकडून दोन लॅपटॉप, तेरा मोबाईल असा एकूण ४ लाख ८१ हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक प्रदीपसिंह सिसोदे, पोलीस उपनिरीक्षक विजय कांबळे, पोलीस अंमलदार सुनील शिरसाट, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे, नागेश माळी यांच्या पथकाने केली.

# 'सरोगसी'चा तिढा




मुंबईतला सर्वसामान्य नोकरदार माणूस. दोन मुली असतानाही, मुलगा हवा या हव्यासातून, खोटी करारपत्रे बनवून 'सरोगसी' प्रक्रियेमध्ये त्याने नोंदणी केली. डॉक्टरांचीही साथ होती. त्याच्या अर्धशिक्षित पत्नीने याविरोधात आवाज उठवला. बालहक्क आयोगापर्यंत तिने दाद मागितली, कायदेशीर संघर्ष केला. या प्रगत तंत्रज्ञानाला त्या वेळी कायद्याची, नियमांची पक्की चौकट नसल्याने अनेक पातळ्यांवर तिला कोंडीत पकडण्यात आले. प्रकरण निकाली निघाले नाही. हे एक प्रातिनिधी उदाहरण. अशा शेकडो पळवाटांनी मूल मिळण्यासाठी असलेला आटापिटा सुरू आहे. नैसर्गिक गर्भधारणा होण्यात ज्यांना वैद्यकीय अडचणी आहेत, अशा व्यक्तींनाच 'सरोगसी'द्वारे गर्भधारणा करण्याचा पर्याय आहे, असे कायदा सांगतो; पण प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे?

नैसर्गिक गर्भधारणा होऊन मुले असलेल्या काही सेलिब्रेटींसह, आर्थिक क्षमता असलेल्या अनेकांनी 'सरोगसी' करून तिसऱ्या, चौथ्या मुलाला जन्म दिला. काही वर्षांपूर्वी परदेशी पाहुण्यांना भारतात 'सरोगसी' प्रक्रियेसाठी बंदी घालण्यात आली, तेव्हा 'सरोगेट' मातांना नेपाळला नेण्याची व्यवस्था करण्यात आली. तिथे झालेल्या भूंकपामध्ये या माता आणि त्यांची बाळे जन्माला येण्यापूर्वी मिटून गेली. वेळोवेळी वाकवण्यात आलेल्या नियमांमुळे, ते सगळ्यांसाठी सारखे का नाहीत, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आणि त्याचे समाधानकारक उत्तर व्यवस्थेने अद्याप दिलेले नाही. कायद्याची चौकट नसताना नैतिक पातळीवर पारदर्शी राहण्याचे कर्तव्य बजावण्याचा सामाजिक संस्कार अभावाने दिसतो. 'सरोगसी'संदर्भातही हेच होत आले आहे. नव्या निर्देशांमुळे अजून पेच निर्माण झाले आहेत. नव्या निर्देशानुसार, 'सरोगसी' करणाऱ्या महिलेला आता आर्थिक मदत देता येणार नाही. ज्या जोडप्याला गर्भधारणेसाठी बाहेरील बीज घेऊन फलन करण्याची गरज लागणार आहे, त्यांना आता ते दात्याकडून थेट घेता येणार नाही. ते



बीजबँकेमध्ये मिळतील. या बँका कुठे व केव्हा सुरू होणार, याची कोणालाही कल्पना नाही. 'सरोगसी' प्रक्रिया करायची असेल, तर यापुढे न्यायालयीन संमती घ्यावी लागणार आहे. मुंगीच्या गतीने चालणाऱ्या यंत्रणांचा अनुभव लक्षात घेता, वयाच्या चाळीसाव्या वर्षी या प्रक्रियेसाठी नावनोंदणी करणाऱ्या जोडप्यांना संमती केव्हा मिळेल आणि बाळ केव्हा होईल, याची चिंता लागली आहे.

'सरोगसी'मध्ये गर्भाशय भाड्याने देणे व ते देणाऱ्या महिलांचे शोषण यासंदर्भात सातत्याने चर्चा झाली आहे. ते होऊ नये, यासाठीच नियम व कायद्यांचे कोंदण घालण्यात आले. मात्र, आता ज्या टप्प्यावर ही प्रक्रिया आहे, तिथे अनेक कायदेशीर, नैतिक आणि सामाजिक पेच आहेत. आता निर्माण झालेल्या प्रश्नांची गुंतागुंत अधिक जटील झाली आहे.

सरोगशी प्रक्रियेकडे वैद्यकीय दृष्टीकोनातून पाहताना, सामाजिक, आर्थिक कारणांचाही विचार व्हायला हवा. वंधत्व, अपत्यप्राप्ती आणि मुलासाठी कौटुंबिक, सामाजिक पातळीवरील दबावातून 'सरोगसी'चा पर्याय स्वीकारणाऱ्या जोडप्यांची संख्या वाढती आहे. ही केवळ धनिकांसाठी चैनीची बाब राहिलेली नाही, तर अशा जोडप्यांमधील चाळीस टक्क्यांहून अधिक मध्यम व उच्च मध्यमवर्गातील आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून अपत्यप्राप्ती झाली, हे सांगण्याचे धाडसही त्यांच्यामध्ये नाही. प्रतिष्ठेच्या भ्रामक कल्पना, वंशसातत्य टिकवून ठेवण्यासाठी असणारा कौटुंबिक व सामाजिक दबाव अशी असंख्य कारणे आहेत. 'सरोगसी' पूर्ण केल्यानंतर, नैसर्गिक गर्भारपणच आहे, हे समाजाला दाखवून देण्याचा आटापिटाही त्यात आहे. त्यामुळेच, पोटाला उशी बांधून नऊ महिने हा 'गर्भभार' सहन करण्यापासून, डोहाळे जेवणापर्यंत सगळ्या सोपस्कारांचे नाइलाजाने नाटक करणारेही खूप आहेत. इतर राज्यांत वा परदेशात निघून जाणाऱ्यांच्या अगतिकतेचाही विचार या निमित्ताने व्हायला हवा.नैसर्गिकरित्या बाळाला जन्म देते, तीच मातृत्त्वाच्या निकषांवर खरी उतरते, ही मानसिकता समाजामध्ये आजही घट्ट आहे. 'मूल हवेच,' असा आग्रह करणारा समाज एखाद्या जोडप्याने स्वखुशीने 'मूल नको'चा घेतलेला निर्णयही मान्य करीत नाही. या दबावामुळे 'सरोगसी'साठी मागेल तितके पैसे देण्याची अगतिकता असते. नव्या निर्देशाप्रमाणे, 'सरोगसी' करण्यासाठी हिरवा कंदील दाखवण्यात आला आहे. मात्र, ही प्रक्रिया कुणी करावी, कुठे करावी यासंदर्भात स्पष्टता नाही. 'आय़व्हीएफ'; तसेच 'सरोगसी' ज्या केंद्रांत करण्यात येते, तेथील वैद्यकीय पडताळणीचे निकष वेगवेगळे असतात. स्थानिक पातळीवर कोणत्या यंत्रणांनी चाचपणी करावी, यासंदर्भात अद्याप स्पष्टता नाही. अनेक गरजू महिला आर्थिक कारणांसाठी 'सरोगसी' करून घेत होत्या. त्यांचे त्यामध्ये काही वेळा पैशासाठी शोषण केले जात असले, तरी आता आर्थिक मोबदला मिळणार नसल्यास त्यासाठी पुढाकार कोण घेईल, हा प्रश्न निर्माण झाला आहे.

कृत्रिम गर्भधारणेसंदर्भात कायद्यात अंतर्भूत केलेल्या नव्या निर्देशानुसार, 'सरोगसी' करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली असली, तरी ही प्रक्रिया कशी करावी, या संदर्भातील तिढा सुटलेला नाही. नोंदणी प्रक्रियेची जबाबदारी कोणत्या स्थानिक यंत्रणेवर असेल, याचे कोणतेही निश्चित नियम नाहीत. ज्यांना 'सरोगसी' प्रक्रियेसाठी स्त्री किंवा पुरुषाचे बीज लागते, ते नव्या नियमानुसार आता केवळ एकदाच घेता येणार आहे. यापूर्वी ते तीन ते सहा वेळा घेता येत होते. उपलब्धता आणि मागणी यांतील तफावतीमुळे या तंत्रज्ञानासाठी लागणारा खर्च ३० ते ४० टक्क्यांनी वाढणार आहे. सातत्याने आवाहन करूनही रक्तदानाचा टक्का वाढत नाही, तिथे बीजदान करण्यासाठी कोण पुढे येणार, असा प्रश्न या क्षेत्रात काही वर्षांपासून कार्यरत असलेले डॉ. केदार गानला उपस्थित करतात.

## संपादकीय »

### नोटा, कागूद आणि माणूस

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने आठ नोव्हेंबर २०१६ रोजी भारतातली तिसरी नोटबंदी केली आणि पाचशे व एक हजार रुपयांच्या नोटा, म्हणजे 'महज कागज के टुकडे' झाले...***

त्या आधी १२ जानेवारी १९४६ रोजी, स्वातंत्र्य दृष्टिपथात असताना ब्रिटिशांनी पाचशे, हजार आणि दहा हजारांच्या नोटा रद्द केल्या. पुढे, १६ जानेवारी १९७८ रोजी पहिल्या जनता सरकारने पुन्हा एक हजार, पाच हजार आणि दहा हजारांच्या नोटा रद्द केल्या. मात्र, अर्थव्यवस्थेचा आकार आणि चलनातील नोटांचे प्रमाण प्रचंड वाढले असल्याने, २०१६मधील नोटबंदीचा सामान्यांना जबर तडाखा बसला. अनेक दिवस गोंधळाची स्थिती झाली. प्रचंड रांगा लागल्या. या नोटबंदीच्या वेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या दोन हजारांच्या नोटा एक ऑक्टोबरपासून चलनातून जात आहेत. सुदैवाने, रिझर्व्ह बँकेने हा निर्णय पुरेसा आधी जाहीर केला. नागरिकांच्या हाती नोटा बदलून घेण्यासाठी १३० दिवस आहेत. या निर्णयानंतर पुन्हा एक हजाराची नोट येणार किंवा इतरही अफवा उठत आहेत. त्याबाबत रिझर्व्ह बँकेने तातडीने स्पष्ट खुलासा करायला

**औद्योगिक क्रांतीनंतर खनिज इंधनांचा वापर वाढत गेला. यामुळे वातावरणात हरितगृह वायूंचे प्रमाण वाढत चालले आहे आणि पृथ्वीच्या सरासरी तापमानात वाढ होते आहे. सन २१००पर्यंत तापमानात होणारी ही वाढ औद्योगिकीकरणाआधीच्या तापमानापेक्षा १.५ अंश सेल्सिअसच्या वर जाऊ न देण्यासाठी, पॅरिस कराराअंतर्गत जागतिक पातळीवर प्रयत्न होत आहेत;**

## 'दीड अंशां'चा अन्वयार्थ

या दशकातच पृथ्वीचे सरासरी तापमान ही मर्यादा ओलांडेल, अशा बातम्यांमुळे अलीकडे खळबळ उडाली आहे.

सन १८५०पासून २०२०पर्यंत पृथ्वीचे सरासरी तापमान १.२ अंश सेल्सिअसने वाढले. जागतिक हवामान संघटनेने वार्षिक व दशवार्षिक वातावरणीय स्थितीच्या अंदाजाचा ताजा अहवाल या महिन्यात प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार या दशकात सर्वसाधारणतः पृथ्वीचे तापमान वाढतच जाईल आणि दशकाच्या उत्तरार्धात, काही वर्षांमध्ये तापमान औद्योगिकीकरणापूर्वीच्या तुलनेने १.५ अंश सेल्सिअसने वाढलेले दिसेल. पॅरिस करारातील लक्ष्मणरेषा ही पृथ्वीचे तापमान अधूनमधून एखाद्या वर्षी नाही, तर कायमस्वरूपी या पातळीच्या वर असण्याशी जोडलेली आहे, हा फरक लक्षात घ्यायला हवा. १८५० ते २०२० दरम्यानही काही वर्षे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढले, तर काही वर्षे कमीही झाले.

सन २१००मध्ये पृथ्वी पाच अंश सेल्सिअसने तापलेली असेल, असे या शतकाच्या सुरुवातीला वाटत होते; पण जागतिक ऊर्जाक्षेत्रातील संक्रामक बदलांमुळे तापमानवाढीचा वेग मंदावला. सन २१००पर्यंत तापमान तीन अंशांनी वाढलेले असेल, असे आता दिसते. विकसित देशांतील जनमताच्या वाढत्या रेट्यामुळे आणि जागतिक अर्थकारणातील नव्या प्रवाहांमुळेही नजीकच्या भविष्यात



खनिज इंधनांचा वापर कमी होऊन तापमानवाढ आणखी मंदावेल, अशी तज्ज्ञांना आशा वाटते. थोडक्यात म्हणजे, पॅरिस कराराचे अंतिम ध्येय अजूनही मानवजातीच्या आवाक्यात आहे. अर्धवट माहितीतून पसरवल्या जाणाऱ्या जगबुडीच्या भाकितांकडे दुर्लक्ष करू या. जागतिक तापमानवाढ थोपवण्यासाठी व्यक्तिगत, सामूहिक व धोरणात्मक बदलांसाठी आग्रही राहू या.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ईडीकडून तब्बल साडेनऊ तास चौकशी!

## चौकशीनंतर जयंत पाटील ईडी कार्यालयाबाहेर पडताच कार्यकर्त्यांचे मानले आभार

।मुंबई।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी आश्वासने देऊन नागिरकांना मोठी स्वप्ने दाखवितात. दिलेली आश्वासने ते कधीच पूर्ण करीत नाहीत. त्यांच्यासारखा खोटारडा माणूस पाहिला नाही, अशी जहरी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.नाना पटोले यांनी एका कार्यक्रमात बोलत होते. त्यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली.**




ईडीच्या सर्व प्रश्नांची मी समाधानकारक उत्तरे दिली आहेत. त्यांच्याकडे कुठलेही प्रश्न शिल्लक राहिले असतील, असे वाटत नाही,' अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोमवारी ईडीच्या साडेनऊ तासांच्या चौकशीनंतर दिली. सकाळपासून उपस्थित असलेल्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचे पाटील यांनी आभार मानले.

'चौकशीला सामोरे जाताना माझ्याकडे एक पुस्तक होते. ते निम्मे वाचून झाले,' असेही ते म्हणाले. पुढील समन्स कधी, असा प्रश्न विचारता त्याचे उत्तर देण्याचे त्यांनी टाळले. 'माझे कर्तव्य मी पार पाडले. मी कायदा पाळणारा नागरिक आहे. प्रश्न विचारणाऱ्या ईडीच्या चौकशी अधिकाऱ्यांनी चांगली वागणूक दिली. जवाब नोंदविण्याच्या कामास टायपिंग करण्यासाठी अधिक वेळ लागला म्हणून तुम्हाला बराच वेळ बसावे लागले,' असेही जयंत पाटील यांनी समर्थकांना सांगितले. 'तुमच्या आशीर्वादाने मी कधीही चुकीचे काम केले नाही. राज्यात ३१६ तालुक्यांत राष्ट्रवादी, काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलने केली. त्या सर्वांचे अभिनंदन करतो. हा विश्वास आपण राष्ट्रवादी आणि शरद पवार यांच्या पाठिशी कायम दाखवाल,' असे पाटील यांनी नमूद केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे सोमवारी साडेनऊ तास ईडी चौकशीला सामोरे गेले. त्यांच्या चौकशीच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मुंबई राष्ट्रवादीच्या प्रदेश कार्यालयासमोर आंदोलन केले. यावेळी राष्ट्रवादीचा एकही बडा नेता उपस्थित नव्हता. सकाळपासून राष्ट्रवादीच्या प्रदेश कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. ईडीविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. बहुसंख्य कार्यकर्ते सांगलीतील इस्लामपुरातून आले होते. अनेकांच्या हातात 'हवालदारांचा नेता टरबुजा' असे फलक होते. ईडी कार्यालय हे प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयाजवळ आहे. त्यामुळे ईडी कार्यालयाभोवती पोलिसांचा मोठा फौजफाटा होता.

जयंत पाटील दुपारी १२ वाजता पक्ष कार्यालयात आले. तेथे त्यांनी कार्यकर्त्यांशी चर्चा केली. नंतर ते पायी ईडी कार्यालयात गेले.

### अर्ध पुस्तक वाचून काढलं- जयंत पाटील

**साडेनऊ तास आतमध्ये नेमकं काय झालं? या प्रश्नावर बोलतांना जयंत पाटील म्हणाले की, पूर्ण दिवस गेला, कारण प्रत्येक प्रश्नाचं लिखित स्वरुपात उत्तर दिलं जात होतं. ते उत्तर पुन्हा टाईप होणं, ते दुरुस्त करणं. ही प्रक्रिया चालते. मी चौकशीला पूर्ण सहकार्य करायचं ठरवलं होतं. मात्र त्यांचा प्रक्रियेला वेळ लागतो त्यामुळे तेवढा कालावधी जातोच. उत्तर दिल्यानंतर त्यांची प्रक्रिया सुरुच होती. मी मात्र या वेळेत 'शिवकालीन महाराष्ट्र' हे पुस्तक अर्ध वाचून काढलं. त्यांनी विचारलेल्या सगळ्या प्रश्नांची मी उत्तरं दिली आहेत. महाराष्ट्रातली लोकं जागरुक, सुजाण आहेत. सर्वांना सगळं कळेलच. असं शेवटी जयंत पाटील म्हणाले. जयंत पाटील म्हणाले की, ईडीच्या अधिकाऱ्यांचं समाधान मी केलेलं आहे आणि ते बोलावतील तेव्हा मी जाईन, मात्र आता त्यांचं समाधान झालेलं आहे असं माझं मत आहे. माझा आयएलएफएस नावाच्या संस्थेशी कधीही संबंध आलेला नाही. त्यांच्या सगळ्या प्रश्नांची मी उत्तरं दिली आहेत.**

# ३० सप्टेंबरनंतरही २ हजारांच्या नोटा वैधच!; रिझर्व्ह बँकेचे स्पष्टीकरण

।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

दोन हजारांच्या नोटा चलनातून मागे घेण्यात येणार असल्या तरी त्यांचा वैध आणि विधिसंमत चलन म्हणून दर्जा कायम राहणार आहे, अशी माहिती रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी दिली. तथापि, या संबंधात काढलेल्या परिपत्रकात ३० सप्टेंबरपर्यंत नोटा बदलून किंवा बँकांमध्ये जमा न केल्यास काय होईल, याबद्दल काहीही स्पष्टपणे नमूद केलेले नसल्याने सर्वसामान्यांमध्ये संभ्रमाची स्थिती कायम आहे.रिझर्व्ह बँकेच्या चलन व्यवस्थापनाचा भाग म्हणून दोन हजारांच्या नोटा मागे घेतल्या गेल्या असून वैध चलन म्हणून या नोटेचा दर्जा कायम राहणार असल्याने दास यांनी सोमवारी येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. त्यामुळे दोन हजारांची नोट पुढेही वस्तू व सेवा खरेदीसाठी वापरता येऊ शकते, असे ते म्हणाले. दास यांच्या मते, दोन हजारांच्या बहुतांश नोटा ३० सप्टेंबरपर्यंत परत येतील. अंतिम मुदत जवळ येईल तेव्हा बदलण्यात आलेल्या नोटांचे प्रमाण लक्षात घेऊन गरज पडल्यास मुदतवाढीचा निर्णयही घेतला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**‘अर्थव्यवस्थेवर किरकोळ परिणाम’**

दोन हजार रुपयांच्या नोटा चलनातून मागे घेण्याच्या निर्णयाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर अतिशय किरकोळ परिणाम होईल, कारण या नोटांचे चलनातील प्रमाण केवळ १०.८ टक्के आहे, अशी माहिती दास यांनी दिली. दोन हजारांच्या नोटांचा सर्वसाधारण व्यवहारात कमी वापर होत असल्याचे निदर्शनास आले असल्याचे ते म्हणाले. एक हजाराची नोट चलनात आणण्याचा सध्या तरी कोणताही प्रस्ताव नसल्याचेही दास यांनी स्पष्ट केले.

# काँग्रेसचे आता पाच राज्यांकडे लक्ष

## विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू, महत्त्वाची बैठक बोलावली

।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर काँग्रेसने आता मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, मिझोराम आणि तेलंगण विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठीच्या रणनितीवर लक्ष केंद्रित केले. या राज्यांत होणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी या राज्यातील नेत्यांसमवेत बुधवारी (ता. २४) महत्त्वाची बैठक बोलावली आहे.**



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील काही महिन्यांत मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगण आणि मिझोराममध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी तयारी सुरू केली आहे. यामध्ये राजस्थान, छत्तीसगड, मध्यप्रदेशात पक्षांतर्गत गटबाजी शांत करणे, कर्नाटकमध्ये ज्याप्रमाणे राष्ट्रीय मुद्दे बाजूला ठेवून स्थानिक मुद्द्यांवर भाजपला घेरण्यात यश आले होते, तशा प्रकारे प्रभावी स्थानिक मुद्दे शोधणे, कल्याणकारी योजनांच्या आधारे मतदारांना साद घालणे आणि विशेषतः राजस्थान व छत्तीसगडमध्ये मतदारांमधील सत्ताविरोधी भावना कमी करणे यावर कॉंग्रेसमध्ये मंथन केले जात आहे. उद्या (ता.२४) होणाऱ्या संबंधित राज्यांच्या नेत्यांच्या उपस्थितीत या मुद्द्यांवर व्यापक विचारविनिमय होईल. राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत, छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्यासह या चारही राज्यांमधील प्रदेशाध्यक्ष या बैठकीत उपस्थित राहतील. या बैठकीत कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे या नेत्यांसमवेत एकत्रित आणि त्यानंतर स्वतंत्रपणे चर्चा करतील, असे काँग्रेस सूत्रांनी सांगितले. काँग्रेसचा हिंदी पट्ट्यातील छत्तीसगड, राजस्थान आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये भाजपशी थेट मुकाबला आहे. तर तेलंगणात कॉंग्रेसला सत्ताधारी भारत राष्ट्र समिती आणि भाजपसमवेत झुंज द्यावी लागणार आहे. कॉंग्रेसने राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये पुन्हा एकदा सत्तावापसीचे तर मध्यप्रदेशात ‘ऑपरेशन कमळ’द्वारे सत्तेत आलेल्या भाजप सरकारला धोबीपछाड देण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे.

### असंतुष्टांना शांत करावे लागणार

**राजस्थानमध्ये मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्यात गटबाजी टोकाला पोचली आहे. त्याच धर्तीवर छत्तीसगडमध्ये मुख्यमंत्री भूपेश बघेल आणि मुख्यमंत्रिपदाची महत्त्वाकांक्षा असलेले अर्थ व आरोग्यमंत्री टीएस सिंगदेव यांच्यातही संघर्ष पेटला आहे. तेलंगणात देखील प्रदेशाध्यक्ष रेवंत रेड्डी यांचे नेतृत्व पक्षाच्या अन्य नेत्यांनी मनापासून स्वीकारलेले नाही. त्यापार्श्वभूमीवर या राज्यांमधील असंतुष्टांना शांत करतानाच कर्नाटकच्या धर्तीवर मतदारांना आकर्षित करण्याची रणनिती आखावी लागणार आहे. त्यासाठीची बुधवारी होणारी बैठक महत्त्वाची असेल.**

# पूजा हेगडेने गायलं मराठी भक्तीगीत..

बॉलीवुड आणि टॉलीवुड अभिनेत्री पूजा हेगडे सध्या भलतीच चर्चेत आली आहे. मध्यंतरी ती सलमान सोबत डेट करत असल्याच्या चर्चा उठल्या होत्या. तर आता तिचा 'सर्कस' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अत्यंत तडगी स्टारकास्ट असलेल्या या सिनेमाच्या प्रमोशनसाठी पूजा, रणवीर सिंग आणि संपूर्ण टीम सर्वत्र भेट आहेत. याच निमित्ताने ते 'झी मराठी' वरील 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमात आले होते. यावेळी पूजाने चक्क मराठी भक्तीगीत गाऊन सर्वांना आश्चर्याचा धक्काच दिला.



गेल्या काही वर्षांपासून 'चला हवा येऊ द्या'(Chala Hawa Yeu Dya) हा कार्यक्रम रसिक मनांचं मनोरंजन करत आहे,न थकता,न चुकता. यातील कुशल बद्रिके,भाऊ कदम(Bhau Kadam),श्रेया बुगडे(Shreya Bugde),गणेश भारतपुरे,सागर कारंडे,डॉ. निलेश साबळे(Dr.Nilesh Sable) या सहा जणांची टीम नुसती धमाल उडवत असते. त्यामुळे मराठीच नाही तर बॉलीवुडलाही या कार्यक्रमाची भुर पडली आहे. त्यामुळे अनेक बॉलीवुड कलाकार आपल्या चित्रपटाचे प्रमोशन करण्यासाठी या कार्यक्रमात येत असतात. यंदा 'सर्कस' चित्रपटाच्या टीमने हजेरी लावली होती. यावेळी अभिनेता सिद्धार्थ जाधव, रणवीर सिंग, दिग्दर्शक रोहित शेट्टी, अभिनेत्री पूजा हेगडे, जॉनी लिव्हर, जॅकलिन फर्नांडिस आणि अनेक कलाकार उपस्थित होते. यावेळी पूजा हेगडेला मराठी गाणं गाण्याची विनंती करण्यात आली आणि तिने चक्क भक्तीगीत गायला सुरूवात केली. यावेळी पूजाने 'देहाची तिजोरी.. भक्तीचाच ठेवा.. उघड दार देवा आता.. उघड दार देवा' हे मराठीतील लोकप्रिय भक्तीगीत गायलं. तिच्या तोंडून ही भजन आल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. निलेश साबळे सह सर्वांनीच तिच्यासाठी जोरदार टाळ्या वाजवल्या.

# सैराटच्या ७ वर्षांनंतर किती बदलला आकाश ठोसर

मुंबई- 'सैराट'च्या नेत्रदीपक यशानंतर 'एफयू', 'झुंड' आणि अलीकडे 'घर, बंदूक बिरयानी' या चित्रपटांत आकाश ठोसर झळकला. त्यापूर्वी '१९६२- द वॉर इन द हिल्स', 'लस्ट स्टोरीज' या सीरीजमध्येही त्यानं काम केलं.

सात वर्षे होऊनही आजही रसिकांचं तेवढंच प्रेम मिळत आहे. मला त्या भूमिकेच्या नावानंच ओळखलं जातं आहे. हे फार कमी लोकांच्या वाट्याला येतं. एखाद्या दुर्गम भागातल्या ट्रेकला गेल्यावर तिथल्या पाड्यावरची मुलं आणि आजी अशा दोन पिढ्यांची माणसंही जेव्हा 'परशा' म्हणून ओळख देतात तेव्हा छान वाटतं. प्रत्येक भूमिकेतून बाहेर पडावं लागतंच. मात्र, ही ओळख पुसण्यापेक्षा ती कायम ठेवून सगळ्या प्रकारच्या भूमिका साकारच्या आहेत. ज्यांना परशाइतकंच प्रेम मिळावं.

माझ्यासाठी हा प्रवास अजूनही स्वप्नवतच आहे. मी इथं असेन असा विचारही कधी केला नव्हता, ना असं काही स्वप्नं पाहिलं होतं. मी मध्यमवर्गीय कुटुंबातला मुलगा आहे. सरकारी नोकरी करावी आणि आई-वडिलांसाठी छान घर बांधावं असं मनांत होतं. पोलीस आणि आर्मी भरतीसाठी गेलो आणि स्पर्धा परीक्षेचाही विचार केला. मात्र, आता या क्षेत्रात स्थिरावल्यानं पालकांनाही समाधान वाटतं. प्रेक्षकांचं प्रेम सोबत आहेच.

सतत तिथं असण्याची गरज वाटत नाही. मला निवांत राहायला आवडतं. ट्रेकिंग आणि खाणं या दोन गोष्टींसाठी



माझी सतत भ्रमंती सुरू असते. या सगळ्याच गोष्टींची सोशल मीडियावर पोस्ट कशासाठी करायची, असा प्रश्न मला पडतो. मी माझे क्षण मजेत जगत आहे आणि मला तसंच जगायला आवडतं. चित्रपट वा प्रमोशननिमित्त जितकं इथं असायला हवं, तितकाच मी असतो. करिअरच्या सुरुवातीलाच अमिताभ बच्चन यांच्यासारखा महानायक असो वा इतरही प्रसिद्ध अभिनेत्यांसोबत तुला काम करण्याची संधी मिळाली. बच्चनसाहेबांबद्दल काय बोलावं, लहानपणापासूनची नायकाची छबी आणि त्यांच्यासोबत काम करण्याची संधी हेच स्वप्नवत आहे. नुकतंच सयाजी शिंदे यांच्यासोबतही काम केलं. आधी मला टेन्शन होतं; पण पहिल्याच भेटीत त्यांनी मिठी मारली आणि ते दूर झालं.

# तू झूठी मैं मक्कार' चित्रपटाचे टायटल रीलीज

लव फिल्म्सने अलीकडेच आपल्या आगामी चित्रपटाच्या शीर्षकाचा एक टिझर प्रदर्शित केला ज्यामध्ये दर्शकांना रणबीर कपूर आणि श्रद्धा कपूर अभिनीत आगामी चित्रपटाच्या शीर्षकाची झलक पाहायला मिळाली. तसेच, निर्मात्यांनी या टिझरमध्ये शीर्षकाच्या "TJMM"या इनीशियल्सचे अनावरण केले होते, त्यामुळे दर्शकांमध्ये चित्रपटाचे शीर्षक काय असेल यावरून उत्कंठा वाढत असतानाच निर्मात्यांनी अखेरीस या चित्रपटाचे टायटल रिलीझ केले आहे. अशातच, लव फिल्म्सने रणबीर कपूर आणि श्रद्धा कपूर अभिनीत आगामी चित्रपटाचे टायटल 'तू झूठी मैं मक्कार'चे अनावरण केले आहे. तसेच,



प्रीतमद्वारा म्युजिक आणि अमिताभ भट्टाचार्यद्वारा लिरिक्सकडे इशारा करताना, व्हिडिओचे शीर्षक रणबीर आणि श्रद्धा यांच्यातील मजेदार केमिस्ट्रीची ओळख करून देते.टायटल व्हिडिओमध्ये श्रद्धा आणि रणबीर कपूर यांनी साकारलेल्या 'झूटी' आणि 'मक्कार' या पात्रांसह चित्रपटाच्या खोडकर जगाची झलक पाहायला मिळते.

# मराठमोळ्या चित्रपट समीक्षकाचा मोठा सन्मान



मुंबई- फ्रान्समध्ये सुरू असलेल्या कान्स फिल्म फेस्टिव्हल दरम्यान ज्येष्ठ चित्रपट-समीक्षक आणि अभ्यासक अशोक राणे यांना यंदाचा 'सत्यजित राय स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. फिप्रेस्की या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या अध्यक्षा इसाबेल डॅनल यांच्या हस्ते हा पुरस्कार राणे यांना देण्यात आला. कान फिल्म फेस्टिव्हलमधल्या इंडिया पॅव्हेलियन इथं हा कार्यक्रम पार पडला. सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

काही दिवसांपूर्वी राणे यांना हा पुरस्कार जाहीर झाला होता. फिप्रेस्की इंडिया या संस्थेतर्फे सिनेमासंदर्भातलं उत्तमोत्तम लेखन करणाऱ्या लेखकाला हा पुरस्कार देण्यात येतो. यापुर्वी अरुणा वासूदेव (२०२१) प्रो. शनमुगदास (२०२२) यांना सत्यजित रे स्मृती पुरस्कार देण्यात आला आहे. अशोक राणे हे गेली ४६ वर्ष सिनेमा संदर्भात लेखन करत आहेत. त्यांना या लेखनासाठी आजवर तीनदा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. असा पुरस्कार मिळवणारे ते मराठीतले एकमेव लेखक आहेत. अशोक राणे यांनी मराठीतून जागतिक सिनेमावर आजवर विपुल लेखन केलंय. याशिवाय त्यांनी इंग्रजीतूनही बरेच लेखन केले आहे. चित्रपट समीक्षा लेखनाच्या क्षेत्रात त्यांनी स्वतःचा वेगळा ठसा आणि ओळख निर्माण केली आहे.



# ड्रग्जच्या ओव्हरडोसमुळं अभिनेता आदित्य सिंग राजपूतचा मृत्यू

मुंबई: लोकप्रिय अभिनेता, मॉडेल आणि कास्टिंग डायरेक्टर आदित्य सिंग राजपूत याचा रहस्यमयरीत्या मृत्यू झाला आहे. सोमवारी दुपारी अंधेरीतल्या घरच्या बाथरूममध्ये त्याचा तो मृतावस्थेत आढळला आहे. आदित्यच्या मित्रांना तो बिल्डींगमधल्या ११ व्या मजल्यावर मृतावस्थेत आढळला होता. त्यानंतर आदित्यचे मित्र वॉचमनच्या मदतीनं त्याला रुग्णालयात घेऊन गेले. पण दुर्दैवानं डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. मिळालेल्या माहितीनुसार ड्रग्जचं अतिसेवन केल्यानं आदित्यचा मृत्यू झाल्याचं म्हटलं जात आहे.आदित्य सिंग राजपूत हा टीव्ही इंडस्ट्रीतला लोकप्रिय चेहरा होता. त्यानं मॉडेल म्हणून करिअरची सुरुवात केली होती. काही रिॲलिटी शोमध्येही तो झळकला होता. त्यानंतर त्यानं कास्टिंग डायरेक्टर म्हणून काम सुरू केलं होतं. आदित्यनं त्याच्या करिअरची सुरुवात १७ व्या वर्षी केली होती. आदित्यचं कुटूंब उत्तराखंडचं असलं तरी त्याचा जन्म दिल्लीत झाला होता.

# निर्भेळ यशासाठी भारत सज्ज!

## दोन्ही सामने गमावल्यामुळे हा सामना जिंकून लाज वाचवण्याची अखेरची संधी

। बेंगळुरू ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**कानपूर आणि कोलकात्यामध्ये सहज विजय मिळवत भारतीय संघाने न्यूझीलंडविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत विजयी आघाडी घेतली आहे. पण होळकर स्टेडियमवर होणारा हा सामना जिंकून मालिकेत निर्भेळ यश संपादन करण्यासाठी भारतीय संघ सज्ज झाला आहे. दुसरीकडे दोन्ही सामने गमावल्यामुळे हा सामना जिंकून लाज वाचवण्याची ही अखेरची संधी असेल.**



विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली भारताने मायदेशामध्ये १४ कसोटी सामन्यांपैकी १२ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. यापूर्वी भारताने २०१२-१३ साली ऑस्ट्रेलियाला ४-० असे पराभूत केले होते. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्धची मालिकाही भारताने जिंकली होती. त्यानंतर आता निर्भेळ यश मिळवण्याची भारताकडे संधी चालून आली आहे. भारतीय संघामध्ये चांगला समन्वय दिसत असून त्यांच्याकडून अष्टपैलू कामगिरी पाहायला मिळत आहे. मुरली विजय, चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे यांच्याकडून सातत्याने चांगली फलंदाजी पाहायला मिळाली आहे. या सामन्यात सलामीवीर गौतम गंभीरला खेळण्याची संधी मिळणार असून त्याच्यावर साऱ्यांचे लक्ष असेल. रोहित शर्मा आणि वृद्धिमान साहा यांच्याकडूनही चांगली फलंदाजी गेल्या सामन्यात पाहायला मिळाली. फक्त कोहलीची बॅट अजूनही तळपलेली पाहायला मिळालेली नाही. रवीचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजा या फिरकीपटूंनी चोख कामगिरी बजावली आहे. मोहम्मद शमीही चांगल्या फॉर्मात आहे. या सामन्यात दुखापतीमुळे मध्यमगती गोलंदाज भुवनेश्वर कुमार खेळणार नसल्याने त्याच्या जागी उमेश यादव किंवा अमित मिश्रा यांना खेळपट्टी पाहून संघात स्थान दिले जाईल. न्यूझीलंडच्या फलंदाजांना आतापर्यंत छाप पाडता आलेली नाही, अपवाद फक्त टॉम लॅथमचा. कारण गेल्या दोन्ही सामन्यांमध्ये लॅथमने चांगली फलंदाजी केली आहे. विल्यमसन या सामन्यासाठी संघात दाखल झाला असल्याने न्यूझीलंडची फलंदाजी अधिक चांगली होण्यास मदत होऊ शकते. अनुभवी रॉस टेलरला अजूनही छाप पाडता आलेली नाही. गोलंदाजीमध्ये ट्रेंट बोल्ट, मॅट हेन्री, मिचेल सँटनर, जीतन पटेल आणि इश सोढी यांनी सातत्यपूर्ण चांगली कामगिरी केली आहे.दोन्ही संघांचा विचार करता भारताचे पारडे न्यूझीलंडपेक्षा नक्कीच जड आहे. गेल्या दोन सामन्यांमध्ये भारताने न्यूझीलंडपेक्षा सर्व आघाड्यांवर दमदार कामगिरी केली आहे. त्यामुळे कामगिरीमध्ये सातत्य राखल्यास भारताला मालिकेत निर्भेळ यश मिळवता येऊ शकते.

### संघ

» भारत : विराट कोहली (कर्णधार), गौतम गंभीर, मुरली विजय, चेतेश्वर पुजारा, अजिंक्य रहाणे, रोहित शर्मा, वृद्धिमान साहा (यष्टीरक्षक), रवीचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, मोहम्मद शमी, अमित मिश्रा, उमेश यादव, जयंत यादव, शार्दूल ठाकूर आणि करुण नायर.

» न्यूझीलंड : केन विल्यमसन (कर्णधार), ट्रेंट बोल्ट, डग ब्रेसवेल, जीतन पटेल, मार्टीन गप्तील, मॅट हेन्री, टॉम लॅथम, जेम्स नीशाम, हेन्री निकोल्स, ल्यूक रॉंची (यष्टीरक्षक), मिचेल सँटनर, इश सोधी, रॉस टेलर, नेल वॅगनर, बीजे वॅल्टिंग.

> माझी तब्येत आता ठीक आहे आणि आशा करतो की या सामन्यात मी खेळेन. आतापर्यंतच्या कामगिरीपेक्षा अधिक चांगला खेळ आम्हाला करावा लागणार आहे. मालिका गमावली असली तरी आमच्यासाठी प्रत्येक सामना महत्त्वाचा आहे. त्यामुळे या सामन्यात पूर्ण तयारीनिशी आम्ही उतरणार असून या वेळी सर्वात चांगली कामगिरी करू, अशी आशा आहे.
> – केन विल्यमसन, न्यूझीलंडचा कर्णधार

> माझ्यासाठी ही शिकण्याची प्रक्रिया आहे. कसोटी सामन्यातील प्रत्येक सत्रामध्ये कसा खेळ करावा, समतोल साधावा हे मी शिकत आहे. काही वेळेला परिस्थिती चांगली नसते, त्या वेळी नेमके काय करायला हवे मी शिकतो आहे. तिसरा कसोटी सामना जिंकून विजयी घोडदौड कायम ठेवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.
> – विराट कोहली, भारताचा कर्णधार

---

## ट्वेन्टी-२०मध्ये पुन्हा सर्वोत्तम कामगिरी -कोहली

। बंगळूरु ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



ट्वेन्टी-२० क्रिकेटसाठी माझा खेळ आता साजेसा नाही असे अनेकांना वाटते. मात्र, क्रिकेटच्या या प्रारूपात मी पुन्हा सर्वोत्तम कामगिरी करत आहे, असे वक्तव्य रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुचा तारांकित फलंदाज विराट कोहलीने केले. कोहलीने रविवारी गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात नाबाद १०१ धावांची खेळी केली. हे त्याचे सलग दुसरे आणि 'आयपीएल' कारकीर्दीतील एकूण सातवे शतक ठरले. त्यामुळे या स्पर्धेत सर्वाधिक शतकांचा विक्रम कोहलीने आपल्या नावे केला.

गेल्या वर्षीच्या ट्वेन्टी-२० विश्वचषकात भारताला उपांत्य फेरीत पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर कोहली आणि रोहित शर्मा यांसारख्या अनुभवी खेळाडूंना भारताच्या ट्वेन्टी-२० स्थान मिळालेले नाही. परंतु ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये अजूनही सर्वोत्तम कामगिरी करण्यास आपण सक्षम असल्याचे कोहलीने यंदाच्या 'आयपीएल'मध्ये सिद्ध केले. "ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये माझी कामगिरी खालावत चालल्याचे मत अनेकांकडून व्यक्त केले जाते. मात्र, त्यात तथ्य नाही. ट्वेन्टी-२०मध्ये मी पुन्हा माझी सर्वोत्तम कामगिरी करत आहे. मला फलंदाजी करताना मजा येत आहे. मी सध्या ज्या प्रकारे फलंदाजी करत आहे, त्याबाबत खूश आहे," असे कोहली म्हणाला.

## घरेलू मैदानावर धावांचा 'पाऊस' पडला पण मैदानात फिरताना RCB च्या खेळाडूंना अश्रू अनावर!

### प्ले ऑफ मध्ये खेळण्याचा सर्व खेळाडूंच्या स्वप्नांचा चक्काचूर

। नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३ च्या ७० व्या सामन्यात रविवारी गुजरात टायटन्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा पराभव केला. शेवटच्या लीग सामन्यात पराभव झाल्याने आरसीबीचा यंदाच्या आयपीएलमधील प्रवास संपला आणि प्ले ऑफ मध्ये खेळण्याचं सर्व खेळाडूंच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला. आरसीबीच्या खेळाडूंबाबत बोलायचं झालं तर, क्रिकेटवर प्रेम करणारा प्रत्येक व्यक्ती सोशल मीडियावर त्यांची चर्चा करत आहे**



या आयपीएल हंगामात आरसीबीने एकूण १४ सामने खेळले, यामध्ये त्यांचा ७ सामन्यांमध्ये विजय झाला, तर तितक्याच ७ सामन्यांमध्ये त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

परंतु, रविवारी गुजरात टायटन्सविरोधात झालेला पराभव आरसीबीच्या हृदयाला स्पर्श करून गेला. कारण सामना संपल्यानंतर आरसीबीचे सर्व खेळाडू भावनिक झाल्यानं चाहत्यांमध्ये कमालीची शांतता पसरली होती. आरसीबीच्या खेळाडूंचा मैदानात फिरतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला असून चाहत्यांनी प्रतिक्रियांचा वर्षाव केला आहे.

आरसीबीने ७ सामने जिंकून १४ गुण मिळवल्याने गुणतालिकेत ते सहाव्या स्थानावर पोहोचले आणि आयपीएलमधील त्यांचा प्रवास इथेच थांबला. संघाच्या फलंदाजांबाबत बोलायचं झालं तर, कर्णधार फाफ डु प्लेसिसने १४ सामन्यांत सर्वात जास्त ७३० धावा केल्या. याचदरम्यान फाफचा बेस्ट स्कोअर ८४ इतका होता. त्याच्यासोबत सलामीचा फलंदाज विराट कोहलीनेही १४ सामन्यात ६३९ धावांची खेळी केली आणि विराटने या आयपीएलमध्ये दोन शतकही ठोकले.

आरसीबीने ५ विकेट्स गमावत १९७ धावा केल्या. तर गिलने अप्रतिम फलंदाजी करत पुन्हा एकदा शतकी खेळी केली. गिलने ५२ चेंडूत १०४ धावांची नाबाद खेळी केली. यामध्ये ५ चौकार आणि ८ षटकारांचा समावेश आहे. विराट कोहलीच्या सलग दुसऱ्या शतकावर गिलची विजयी शतकी खेळी सर्वांच्याच भुवया उंचावून गेली.